महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**

| | | |
|---|---|---|
| email @- | | call@ |
| **curriculumdept@maa.ac.in** | **७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे- ४११०३०** | **०२०-२४४७६९३८** |


**दिनांक- ३०/०८/२०२५**

**प्रसिद्धी निवेदन-**

**इयत्ता ३री ते १०वी शालेय शिक्षण अभ्यासक्रम- २०२५ प्रस्तावित मसुद्यावर अभिप्राय नोंदविण्याबाबत.**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार इ.३री ते १०वी वर्गांसाठीचा, शालेय शिक्षण अभ्यासक्रम (प्रस्तावित) मसुदा- २०२५ जनतेच्या सूचना व अभिप्राय नोंदविण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे https://www.maa.ac.in/ या संकेतस्थळावर (Homepage) **दिनांक.२८/०७/२०२५ ते दिनांक २७/०८/२०२५** या कालावधीकरीता सर्वांसाठी उपलब्ध करण्यात आलेला होता.

सदर मसुद्यावर अभिप्राय नोंदविण्यासाठी मुदतवाढ देणेबाबत विविध समाजघटकांकडून सूचना प्राप्त झाल्या होत्या त्यास अनुसरुन सदर मसुद्यावर सूचना व अभिप्राय नोंदविण्यासाठी **दि.०७/०९/२०२५** पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तरी, सर्व शिक्षण तज्ज्ञ, शिक्षक, अभ्यासक, पालक, अधिकारी, संघटना व समस्त समाज घटकांनी सदर अभ्यासक्रमाच्या प्रस्तावित मसुद्यावर आपले अभिप्राय दिलेल्या मुदतीत खालील लिंक मध्ये ऑनलाईन नोंदवावेत असे आवाहन करण्यात येत आहे.

अभिप्राय पोस्टाने पाठवायचे असल्यास त्यावर शालेय शिक्षण अभ्यासक्रम (प्रस्तावित) मसुदा- २०२५ बाबत अभिप्राय (अभ्यासक्रम विकसन विभागासाठी) असे ठळक अक्षरात लिहून, वरील पत्त्यावर पाठवावेत.

| | **शालेय शिक्षण अभ्यासक्रम मसुदा- २०२५** | **अभिप्राय नोंदविण्यासाठी LINK** |
|---|---|---|
| **QR Code** | | |
| **LINK** | https://www.maa.ac.in/ | https://forms.gle/2rgGA37iYKfJUYKS6 |

Digitally signed by
RAHUL ASHOK REKHAWAR
Date: 01-09-2025
16:13:03

**(राहूल रेखावार,**भा.प्र.से.)

संचालक

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,

महाराष्ट्र, पुणे.